



दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २७५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.१७ मे २०२५


# श्रीरामपूरमध्ये १४ कोटींचे अमली पदार्थ जप्त; एकास अटक

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** श्रीरामपूर पोलिसांनी केलेल्या कारवाईत १३ कोटी ७५ लाख ४१ हजार रुपये किमतीचा ४०८ किलो अल्प्राझोलम हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. या संदर्भात एका टेम्पोचालकाला अटक करण्यात आली असून, पुणे जिल्ह्यातील एका रसायन अभियंत्याविरुद्ध श्रीराम पूर शहर पोलीस ठाण्यात अमली पदार्थविरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




मिनीनाथ विष्णू राशिनकर (वय ३८, धनगरवाडी, राहाता, अहिल्यानगर) या वाहनचालकाला अटक करण्यात आली आहे, तर विश्वनाथ कारभारी शिपणकर (रा. दौंड, पुणे) याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी श्रीरामपूरमध्ये दिली. या वेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, श्रीरामपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे आदी उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्ह्यात सुमारे १४ कोटी रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्याची ही पहिलीच कारवाई आहे. अटक केलेल्या राशिनकर याला न्यायालयाने दि. २० पर्यंत कोठडी सुनावली.

श्रीरामपूर एमआयडीसी परिसरात छोट्या मालमोटारीतून अमली पदार्थांची वाहतूक होणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी डॉ. शिवपुजे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्यासह पथकाला शोध घेण्यास सांगितले. काल, बुधवारी सायंकाळी श्रीरामपूर दिघी-खंडाळा रस्त्यावर ही छोटी मालमोटार (एमएच २० बीटी ९५१) दिघीच्या दिशेने येताना दिसली. त्याची तपासणी केली असता १४ गोण्यांत पावडर व उर्वरित ७ गोण्यांत स्फटिक आढळले. वाहनचालक राशिनकर याने हे स्फटिक अल्प्राझोलम औषध असून, गोण्यांमधील पांढरी पावडर ही अल्प्राझोलम बनवण्याकरता लागणारा कच्चा माल असल्याचे सांगितले.

अल्प्राझोलम हा अमली पदार्थ असल्याने त्याची खात्री करण्याकरिता फॉरेन्सिक तज्ज्ञांना घटनास्थळी पाचारण केले. या पथकाने केलेल्या तपासणीत प्रथम दर्शनी पावडर व स्फटिक हे अल्प्राझोलम हा अमली पदार्थ व त्यासाठी लागणारा कच्चा माल असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार ६ कोटी ९७ लाख ६७ हजार रुपये किंमतीचे ६८ किलो ७६७ ग्रॅम वजनाच्या अल्प्राझोलम स्फटिकच्या ७ गोण्या तर ६ कोटी ७६ लाख ७४ हजार रुपये किंमतीच्या ३३८ किलो ३७ ग्रॅम वजनाचे अल्प्राझोलम बनवण्याची पावडर १४ गोण्यांमध्ये आढळली. त्याच्यासह १ लाख ४१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात असल्याची माहिती डॉ. शिवपुजे यांनी दिली.

# सुरक्षित प्रवासासाठी एसटीच्या स्मार्ट बस येणार - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, ठाणे :** भविष्यात एसटीच्या प्रवाशांना सुरक्षित प्रवासाबरोबरच वक्तशीर बस सेवा देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेली एसटीच्या स्मार्ट बसेस घेण्यात येणार आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.




नव्या तीन हजार बसेस खरेदीच्या अनुषंगाने बोलावलेल्या बस बांधणी कंपन्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला एस.टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व संबंधित खाते प्रमुखांसह बस बांधणी कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, नवीन लालपरी सह येणाऱ्या सर्व बसेस मध्ये एआय तंत्रज्ञानावर आधारित कॅमेरे, जीपीएस तंत्रज्ञान, एलईडी टीव्ही, वाय-फाय, चालक ब्रेथ ॲनालाइज यंत्रणा, याबरोबरच चोरी- प्रतिबंध तंत्रज्ञान वर आधारित (अँटी थेप्ट टेक्नॉलॉजी) बस लॉक सिस्टम असे आधुनिक तंत्रज्ञान एकात्मिक पद्धतीने लावण्यात येणार असून या बसेस प्रवाशांसाठी अधिक सुरक्षित आणि आरामदायी असतील.

स्वारगेट बसस्थानकावरील घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षेला यापुढे अत्यंत महत्त्व दिले जाणार असून, प्रवासात बसेसमध्ये प्रवाशांसोबत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून, चालकाच्या गाडी चालवण्याच्या पद्धतीवर देखील या कॅमेराचा तिसरा डोळा लक्ष ठेवून असणार आहे. तसेच बसस्थानक व परिसरामध्ये पार्किंग मध्ये उभ्या असलेल्या बसेस देखील पूर्णतः बंद राहतील अशी यंत्रणा बस मध्ये बसविण्यात येणार आहे, अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

**महत्वाच्या माहितीसाठी एलईडी टिव्ही**

नवीन बसेस मध्ये लावण्यात येणाऱ्या एलईडी टीव्ही च्या माध्यमातून जाहिराती बरोबर विविध महत्त्वाच्या घडामोडी तसेच सन्माननीय पंतप्रधान, मुख्यमंत्री यांचे संदेश तातडीने प्रवाशांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवासात देखील प्रवासी जगभरातील घडामोडी बाबत अपडेट राहतील. तसेच बसच्या बाहेरील बाजूस देखील जाहिरात प्रसिद्धीकरिता एलईडी पॅनल लावण्यात येणार आहेत. यातून महामंडळाचा जाहिरात महसूल वाढण्यास मदत होणार आहे.

**फोम बेस आग प्रतिबंधक यंत्रणा**

सध्या तापमान वाढीमुळे एसटी बसेसला आग लागण्याच्या घटना घडत आहेत. या आगीला प्रतिबंध करण्यासाठी फोम बेस आग प्रतिबंधक यंत्रणा लावण्यात येणार असून बसमध्ये ज्या ठिकाणी आग प्रज्वलित होईल, त्याचा शोध घेऊन त्या ठिकाणी संबंधित फोम वापरून आग तात्काळ विजवण्याची व्यवस्था या यंत्रणेत करण्यात आली आहे.

या आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रवाशांचा सुरक्षितते बरोबरच बसच्या अपघातांची संख्या कमी करणे, तसेच बस फेऱ्यांचा वक्तशीरपणा वाढवणे यासाठी देखील मदत होणार आहे. त्यामुळे भविष्यात खऱ्या अर्थाने एसटी स्मार्ट होईल, असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी व्यक्त केला.

# साईबाबा संस्थानवर आता पालकमंत्र्यांची प्रशासकीय समिती

## शिर्डी, संगमनेर व कोपरगाव आमदारांचा समावेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, शिर्डी (अहिल्यानगर) :** राज्य सरकारने शिर्डी येथील साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापनाचे नियंत्रण व कार्यान्वयनासाठी, ६ महिन्यांच्या कालावधीसाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय समिती स्थापन केली आहे. या समितीला ५० लाख रुपये खर्चापर्यंतचे अधिकार देण्यात आले आहेत. विधि व न्याय विभागाने दिनांक १५ मे २०२५ रोजी साईबाबा संस्थानच्या मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांना याबाबत एका पत्राद्वारे सुचित केले आहे.




श्री साईबाबा संस्थानचा दैनंदिन कारभार सुरळीतपणे चालणे, साईभक्त व रुग्णांना उच्च दर्जाची सेवासुविधा पुरवण्यासाठी, व्यवस्थापकीय निर्णय जलदगतीने व्हावे याकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील (२००४) तरतुदींनुसार संस्थानवर व्यवस्थापन समितीची नियुक्ती होईपर्यंत शासनाच्या अखत्यारित ६ महिन्यांकरीता रुपये ५० लाख रुपये आर्थिक मर्यादेपर्यंतचे निर्णय घेण्याकरीता पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यासाठी विनंती केली आहे. या समितीमध्ये जिल्हाधिकारी सहअध्यक्ष आहेत, शिर्डी, संगमनेर व कोपरगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार व शिर्डीचे नगराध्यक्ष समितीचे सदस्य तर साईबाबा संस्थानचे मुख्यकार्यकारी अधिकारी सचिव असणार आहेत. समिती स्थापन करण्यास मान्यता देण्याची मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाला संस्थानस्तरावरुन विनंती करावी, असेही कळवले आहे व न्यायालयाकडून होणा-या निर्णयाबाबत शासनास माहिती द्यावी, अशीही विनंती संस्थानच्या मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात केली आहे.

साईबाबा संस्थानवर विश्वस्त मंडळ नसल्याने जिल्हा प्रधान न्यायाधीश, जिल्हाधिकारी व संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची तदर्थ समिती असून या समितीला औरंगाबाद खंडपीठाच्या मान्यतेशिवाय आर्थिक निर्णय घेता येत नसल्याने भक्त तसेच रुग्णालयाला वेळेवर मदत होत नसल्याने ही प्रशासकीय समिती स्थापण्याची सूचना संस्थानला देण्यात केली आहे. या समितीमध्ये प्रथम संगमनेर व कोपरगाव येथील आमदारांचा समावेश करण्यात आला आहे. लोकसभा सदस्याला मात्र या समितीत स्थान दिलेले नाही.

# थोडक्यात

## एसटी कर्मचाऱ्यांच्या उत्तम आरोग्यासाठी समुपदेशनाबरोबरच विम्याचे कवच - परिवहन मंत्री

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, ठाणे :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन विभागातील चालक, वाहक तसेच तांत्रिक कर्मचाऱ्यांचे शारिरिक तसेच मानसिक आरोग्य सुरळीत राहावे, त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य विम्याचे कवच मिळावे, यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महत्त्वाची पाऊले उचलली आहे. राज्यातील प्रत्येक एसटी महामंडळातील वाहन, चालकांसोबत तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या उत्तम आरोग्यासाठी समुपदेशन करण्यात यावे, तसेच त्यांच्यासोबतच त्यांच्या कुटुंबियांना देखील विम्याचे कवच मिळावे, यासाठी विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या.



राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांना शारीरिक तसेच मानसिक आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात, यासाठी परिवहन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात त्यांच्या दालनात बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

एसटी महामंडळात आजपर्यंत ३० हजार वाहनचालक, ३८ हजार वाहक आहेत. त्याचबरोबर मोठा तांत्रिक कर्मचारी वर्ग कार्यरत आहे. या कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता आणि कामाची गती सक्षमरित्या वाढविण्यासाठी त्यांचे वारंवार समुपदेशन करणे आवश्यक असल्याचे मत परिवहन मंत्री श्री.सरनाईक यांनी यावेळी व्यक्त केले. त्याचबरोबर, एसटी कर्मचाऱ्यांसमवेत त्यांच्या संपूर्ण कुटुंबियांना आरोग्यांच्या दृष्टीने विम्याचे छत्र उपलब्ध करून देण्यात यावे. यासाठी त्यांना ‘आरोग्य कार्ड’ देण्यासंदर्भात परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले. आरोग्य कार्डद्वारे प्रत्येक कर्मचाऱ्यांना वर्षभरातून दोनदा आरोग्य तपासणी होऊन त्यांना आवश्यक त्या सर्व आरोग्य सेवा-सुविधा मिळाल्या पाहिजेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्यातील वाहक-चालक तसेच तांत्रिक कर्मचाऱ्यांना समुपदेशन सोबत विम्याचे कवच या दोन्ही सुविधा सरसकट एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात याव्यात. आरोग्य विमा योजना ही सर्वांना लागू झाली पाहिजे. त्याचप्रमाणे ही सेवा कॅशलेस असावी. प्रत्येक कर्मचाऱ्यांस योग्य उपचार मिळावे आणि उपचार सुरू होण्यापूर्वी विमा कंपनीकडून तात्काळ मंजुरी मिळावी, याबाबत आवश्यक ती उपाययोजना करण्याच्या सूचनाही, मंत्री सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## खापरखेडा मुख्य बाजारपेठेत सर्रास गांजा विक्री

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या मुख्य बाजारपेठेतील एका खाद्य पदार्थ दुकानात खापरखेडा पोलिसांच्या नाकावर टिच्चून सर्रास गांजा विक्री सुरू होती. याप्रकरणी खापरखेडा पोलिसांनी गुप्त माहिती मिळाली. दिनांक १५ मे २०२५ रोजी दुपारच्या सुमारास खाद्य पदार्थ दुकानात धाड टाकण्यात आली. यावेळी पोलीसांना १७ चिलम १७४.५ गांजासह ३ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला त्यामूळे कायदा सुव्यस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ईश्वर गुलाबराव लाड (वय ७०) खापरखेडा यांचे मुख्य बाजारपेठेतील फुटपाथवर खाद्य पदार्थाचे दुकान आहे. मागील अनेक दिवसांपासून या खाद्य दुकानात गांजा विक्री सुरू आहे, शिवाय बंदच्या दिवशी अवैध दारू विक्री सुरू होती. खापरखेडा पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर गुरुवारला सायंकाळी ५ च्या सुमारास धाड टाकली. यावेळी खाद्य पदार्थ दुकानाची झडती घेतली असता पोलिसांना प्लास्टिक पण्णीत ठेवलेला १७४.५ गांजासह १७ चिलम आढळून आल्या एकूण ३ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी ईश्वर लाड याला ताब्यात घेऊन ८ क, २० ब ।। (अ) २९ एनडीपीएम ऍक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.



सदरची कार्यवाही ग्रामीण पोलीस अधिक्षक हर्ष पोतदार, अप्पर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिक्षक संतोष गायकवाड, पोलीस निरीक्षक अरविंदकुमार कतलाम यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पाटणकर, पोउनि आरती नरोटे, प्रफुल राठोड, राजू भोयर, मुकेश वाघाडे, राजकुमार सातूर, कविता गोंडाने यांनी पार पाडली.

## आईला अखेरचा फोन, मग ओमची बॉडी सापडली

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, बुलडाणा :** विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना ताण-तणाव आणि आपल्या घरापासून इतरत्र दुसऱ्या गावी जाऊन स्पर्धेत टिकावं लागत असतं. या तणावातून नेमकं ते काय पावलं उचलतात याकडे देखील लक्ष ठेवणे आवश्यक असते. अन्यथा एखादी मोठी घटना घडू शकते. तसंच, बुलढाणा येथे घडलं आहे.बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरातील जलंब रेल्वे मार्गावर १९ वर्षीय विद्यार्थी ओम विठ्ठल गिरे याचा मृतदेह आढळून आला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ही घटना १५ मे रोजी गुरुवारी सकाळी उघडकीस आली आणि त्यानंतर प्राथमिक तपासात पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.ओम विठ्ठल गिरे हा खामगाव येथील आयटीआय संस्थेत फिटर ट्रेडचे शिक्षण घेत होता. मूळगाव देऊळगावमही तालुका मेहकर येथील रहिवासी असलेला ओम खामगावच्या अमृत नगर परिसरात भाड्याच्या खोलीत राहत होता. घटनेच्या एक दिवस आधी त्याने आपल्या कुटुंबीयांशी फोनवरुन संवाद साधला होता. मात्र, दुसऱ्या दिवशीच त्याचा मृतदेह रेल्वे रुळावर आढळून आल्याने एकच खळबळ माजली आहे.

अक्षराज

# संपादकीय

## खोल खोल पाणी...

पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानची पाणीकोंडी करण्याचे हरेक प्रयत्न भारताकडून होत आहेत. सिंधू जलवाटप करार स्थगित झाला. चिनाब नदीतून सीमेपलीकडे जाणारे पाणी रोखून शत्रूराष्ट्राच्या घशाला कोरड पाडण्याची योजना आहे.

झेलमवरील धरणांचे पाणी रोखणे हा द्राविडी प्राणायाम साध्य करण्यासाठी शक्ती पणाला लावली जात आहे. परिणामांचा अंदाज आल्याने सीमेपलीकडे आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही गदारोळ होत आहे. एवढा सारा गंभीर मामला सुरू असताना, इकडे देशवासीयांना आणि त्यातही महाराष्ट्राला मात्र त्याच पाण्याबद्दल देणेघेणे नसल्याची स्थिती आहे. पाण्याच्या अनियंत्रित उपशाला आवर घालणे शक्य न झाल्याने म ार्चअखेरपर्यंत भूजल पातळी तीन मीटरपर्यंत खोल गेली आहे. एप्रिलची आकडेवारी अद्याप हाती आलेली नाही. जूनच्या पंधरवड्यापर्यंत उन्हाच्या तीव्रतेला सामोरे जायचे असल्याने हा धोक्याचा इशाराच म्हणावा लागेल.

उन्हाच्या झळा बसू लागल्या की, पाणीटंचाई आणि पाठोपाठ घटत्या भूजल पातळीची चर्चा 'नेमेचि येतो पावसाळा' (खरे तर इथे उन्हाळा) या उक्तीप्रमाणे ठरलेली. आधी बेफिकिरीने बेसुमार उपसा करायचा आणि टंचाई भासू लागली की चिंता आणि चिंतन करायचे. मान्सून दाखल झाला की पालथ्या घड्यावर पाणी, असा हा खेळ सुरूच असतो. चांगले पाऊसमान झालेले असल्याने यंदा तशी वेळ येणार नाही, असे साऱ्यांना वाटत होते. परंतु, वाढत्या तापमानापाठोपाठ पाण्याचा उपसा कायम राहिला.

मार्चमध्येच नद्या, तलाव, धरणांतील पाणी घटले. उत्तर महाराष्ट्रात ५४ पैकी ३७ तालुक्यांत भूजल पातळी दीड मीटरने घटली. पाच वर्षांची तुलना करता, अठरा नद्यांच्या खोऱ्यांत चिंताजनक स्थिती आहे. 'सुजलाम सुफलाम' अहिल्यानगर जिल्ह्यात दोन मीटरनी पाणी खालावले. गोदावरी, भीमा, सीना, मुळा, कुकडी आणि प्रवरा या सात नद्यांच्या पोटातील उपसा हे भूजल नष्ट करू पाहतो आहे. तापी, गिरणा, वाघूर, पांझरा, कान आदी नद्यांच्या खोऱ्यांतील चित्रही वेगळे नाही. शहरी व ग्रामीण भागांतही उधळपट्टी थांबायला तयार नाही.

पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही तालुक्यांत किमान दोन, तर कमाल पाच मीटरपर्यंत भूजल घसरले आहे. माणसाची जमिनीच्या पोटात शिरण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. बोअरवेल्सच्या मशिनरींचा खणखणाट ऐकू येतो आहे. विहिरीतील खडकांवर छन्नी-हातोड्यांचे प्रहार पडत आहेत. कानठळ्या बसविणारे भूसुरुंगाचे बार धडकी भरवत आहेत. उन्हाळ्यात राज्यात किमान दहा ते पंधरा हजार विहिरींची भर पडणार आहे. शेतजमीन व औद्योगिकरणासाठी पाण्याचा अनियंत्रित उपसा, लहरी पाऊसमान, वाढते तापमान अशी प्रमुख कारणे भूजल ऱ्हासासाठी कारणीभूत आहेत. परंतु, प्रत्यक्षात जलस्रोत जिवंत ठेवणे व त्यांच्या पुनर्भरणाबाबत कमालीची अनास्था दिसून येते. लागवडीपेक्षा वृक्षतोडीचे प्रमाण अधिक असल्याने मृदेची धूप होत आहे. जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षम ता लोप पावते आहे. परिणामी, तापमान वाढत आहे. जमिनीच्या पोटातही घडामोडी घडून नवीच संकटे उभी ठाकत आहेत. 'जमिनीला काही देणार, तर ती भूजल वा इतर रूपात परतफ ेड करणार,' या सिद्धांताचा विसर पडतो आहे. ओरबाडण्याची वृत्ती थांबत नसल्याने जलदूतांसह पाणी चळवळीत काम करणाऱ्यांचेही प्रयत्न थिटे पडत आहेत. 'जलयुक्त शिवार'सारख्या योजना निष्प्रभ ठरत आहेत, कागदोपत्री कोट्यवधी रुपये खर्च होत असले, तरी ते प्रत्यक्षात झिरपेनासे झाले आहेत. अजूनही वेळ गेलेली नाही. 'सावध ऐका, पुढल्या हाका' या उक्तीनुसार पाणीप्रश्नाबाबत वेगाने हालचाली व्हायला हव्यात. उपायांची जंत्री व वेग वाढायला हवा; अन्यथा, इतर कोणावरचा वा भविष्यात वगैरे राहू द्या; परंतु वर्तमान पिढीवरच 'वॉटर स्ट्राइक' उलटण्याची शक्यता अधिक!

# कृतघ्न तुर्की, अझरबैजानवर भारताचे बहिष्कार अस्त्र

पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी काश्मीरमधील पहलगाम येथे भ्याड हल्ला करून २६ निष्पाप पर्यटकांना ठार केले. या भ्याड हल्ल्याने भारतात संतापाची लाट उसळली. या हल्याचा जगभर निषेध केला गेला. भारतीय सैन्य दलाने ऑपरेशन सिन्दुर मोहीम राबवून पाकव्याप्त काश्म ीरमधील अतिरेक्यांचे अड्डे नष्ट केले. ऑपरेशन सिन्दुर मोहिमेत भारतीय सैन्यदलाने शंभरहून अधिक जहाल दहशतवाद्यांना यमसदनी पाठवून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. भारताने ऑपरेशन सिन्दुर राबवताना फक्त दहशतवाद्यांना टार्गेट केले. भारताने पाकिस्तानी नागरिक किंवा सैन्यदलाला इजा पोहचवली नाही असे असतानाही पाकिस्तानने भारताच्या नागरी वस्तीवर आणि भारतीय सैन्यदलावर ड्रोनद्वारे हल्ला करण्याचा प्रयत्न केला अर्थात भारतीय सैन्यदलाने हा हल्ला परतावून लावतानाच थेट पाकिस्तानात घुसून पाकिस्तानचे हवाई अड्डे नष्ट केले. भारत पाकिस्तान दरम्यान सुरू झालेल्या या युद्धात कारण नसताना तुर्की आणि अझरबैजान या दोन देशांनी पाकिस्तानची बाजू उचलून धरली इतकेच नाही तर तूर्कीने थेट पाकिस्तानला लष्करी मदत करत पाकिस्तानला ड्रोन आणि इतर लष्करी साहित्य पुरवले. पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्यासाठी जे ड्रोन पाठवले होते ते तुर्की या देशानेच दिले होते अर्थात भारताच्या भक्कम संरक्षण दलाने ते हवेतच भेदून टाकले. तुर्की या देशाने पाकिस्तानला मदत करताना थेट भारतावर टीका केली की भारतानेच पाकिस्तानवर हल्ला केला म्हणून त्यांनी पाकिस्तानला मदत केली. वास्तविक पाकिस्ताननेच दहशतवादी हल्ला घडवून आणला त्यामुळे पुढील संघर्ष निर्माण झाला हे संपूर्ण जग मान्य केले असताना तुर्की मात्र हे मान्य करायला तयार नाही याचा अर्थ पाकिस्तानने भारतातदहशतवादी कारवाया कराव्यात, आमच्या निष्पाप नागरिकांना मारावे आणि आम्ही ते निमूटपणे पाहत बसावे असे तूर्कीला सुचवायचे आहे का ? तुर्की प्रमाणेच अझरबैजान या देशाने ही पाकिस्तानला पाठिंबा देत भारतावर टीका केली. या दोन्ही देशांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला नाही मात्र भारतावर टीका करत पाकिस्तानला पाठिंबा दिला. या दोन्ही देशांचा हा कृतघ्नपणाच आहे. कारण या दोन्ही देशांना भारताने वेळोवेळी मदत केली आहे. या दोन्ही देशांना भारताने आपले मित्र राष्ट्र मानले आहे. या देशांनी मात्र भारताशी मैत्री निभावणे तर सोडाच पण भारताचा शत्रू असलेल्या पाकिस्तानला मदत करून भारताशीच शत्रुत्व पत्करले आहे. भविष्यात याचा त्यांना मोठा फटका बसणार हे निश्चित. २०२३ साली तुर्की आणि सीरिया या देशात मोठा भूकंप झाला होता. या भूकंपात तूर्कीची मोठी वित्त आणि जीवितहानी झाली होती. या भूकंपात तूर्कितील ५० हजारांहून अधिक नागरिक मरण पावले होते. तूर्किवर आलेल्या या नैसर्गिक संकटात भारताने आपली मैत्री निभावत तूर्किला अन्नधान्य, कपडे, जीवनावश्यक वस्तू, औषधे यांचा पुरवठा केला. दुसऱ्या कुठल्या देशाच्या आधी भारताने या देशांना मानवी सहाय्य पुरवण्यासाठी धाव घेतली. त्यासाठी भारताने ऑपरेशन दोस्ती मोहीम राबवली. ऑपरेशन दोस्ती म ोहिमेअंतर्गत भारताने तूर्कीला संकट काळात मदत केली त्यामुळे तेथील जनतेने भारताचे आभार मानले मात्र तेथील सरकारने काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानला पाठींबा देत कृतघ्नपणा केला आणि आता युद्धात पाकिस्तानच्या बाजूने उभे राहून भारताशी शत्रुत्व पत्करले. दरवर्षी लाखो भारतीय तुर्कीला भेट देतात. त्यातून त्यांना वर्षाला तीन ते साडेतीन हजार कोटी रुपयांचा महसूल मिळतो. अझरबैजान या देशातही लाखो भारतीय पर्यटक भेट देतात. त्यांची अर्थव्यवस्थाही भारतीय पर्यटकांवर अवलंबून आहे. या दोन्ही देशातून भारतात व्यापार चालतो. तुर्की या देशातून मोठ्या प्रमाणात फळांची आयत होते. तुर्की या देशातून येणाऱ्या सफरचंदाला भारतात मोठी मागणी आहे. तुर्की आणि अझरबैजान या देशात चित्रपट निर्माते, दिग्दर्शक चित्रपटांचे, मालिकांचे आणि वेबसिरिजचे चित्रीकरण करतात त्यातूनही त्यांना मोठा महसूल मिळतो आता या दोन्ही देशांनी जो कृतघ्नपणा केला त्यामुळे या दोन्ही देशांविरुद्ध भारतात संतापाची लाट उसळली असून या दोन्ही देशांना धडा शिकवण्यासाठी बॉयकॉट तुर्की अँड अझरबैजान ही मोहीम भारतात राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत भारतातील नागरिक या दोन्ही देशांवर बहिष्कार टाकत आहेत. बॉलिवूडने तुर्की आणि अझरबैजान या दोन्ही देशात चित्रीकरण करण्यास नकार दिला असून या देशांवर बहिष्कार टाकला आहे. पर्यटक व्यावसायिकांनीही या दोन्ही देशातील आपले बुकिंग रद्द करून त्यांच्यावर बहिष्कार टाकला आहे. व्यापाऱ्यांनीही तूर्कितून येणाऱ्या वस्तूंवर बहिष्कार टाकला आहे. भारताचे हे बहिष्कार अस्त्र या दोन्ही देशांच्या मुळावर येणार आहे. भारतीय नागरिकांनी या दोन्ही देशांवर टाकलेल्या या बहिष्कार अस्त्राने या दोन्ही देशांची अर्थव्यवस्था गोत्यात येऊ शकते. असंगाशी संग केल्याचा परिणाम या दोन्ही देशांना भविष्यात भोगावा लागणार आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# खेलो इंडिया युवा स्पर्धेत महाराष्ट्राची विजेतेपदाची हॅटट्रिक मुख्यमंत्री यांच्याकडून खेळाडूंचे अभिनंदन

**दि.१६, मुंबई :** 'भले शाब्बास!, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आपण सर्वांनी महाराष्ट्राच्या क्रीडा गौरवात आणखी भरच घातली आहे. या यशामुळे आपण सर्व खेळाडू महाराष्ट्राचा अभिमान आहात,' अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खेलो इंडिया युवा स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपदाची हॅट्रिकाचा पराक्रम साधणाऱ्या महाराष्ट्राच्या चमुतील खेळाडुंचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी करीत ५८ सुवर्ण, ४७ रौप्य, ५३ कांस्य अशी एकूण १५८ पदकांची लयलूट केल्याबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अत्यंत आनंद झाल्याचे नमूद केले आहे. तसेच या ७ व्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राने तब्बल ९




स्पर्धा विक्रमांचा पराक्रमही नोंदविणे अभिमानास्पद असल्याचे म्हटले आहे.

'ग्रामीण भागांतून येणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे, त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर जाण्यासाठीची प्रेरणा मिळावी यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'खेलो इंडिया स्पर्धा' २०१८ पासून सुरू झाली.

या स्पर्धेत आतापर्यंत महाराष्ट्राने पाचव्यांदा विजेतेपदावर आपले नाव कोरणे ही बाब आपल्या ग्रामीण भागातील खेळाडूंच्या गुणवत्तेची चुणूक दाखवणारी आहे. या स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक, मार्गदर्शक आणि खेळाडूंच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिलेल्या त्यांच्या कुटुंबीयांचे देखील कौतुक करावे तितके थोडेच आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. तसेच या सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## शिवबा निती..

शिवबा गनिमीकावा
कळे महात्म्य किती
कधी कसे हो हल्ला
शत्रू पक्षा नांदे भिती

कौशल्य ते वापरात
नव युगातआजमिती
ध्येयशुध्द मनामनात
हवी स्वराज्यनिर्मीती

भोवताली परिस्थिती
निसर्गाची घे अनुमती
मावळे जमवा जमवी
निश्चित करे परिमिती

अभ्यास करी शत्रुंचा
हेरगिरी द्वारे प्रमिती
बहिर्जी सारखे हुशार
आखती पूर्ण भूमिती

सरदारां एकवाक्यता
अंतरात्म्यांत सहमती
युध्द कलेचा अभ्यास
आजहीकरते समिती

अचूक वार कसे करी
वापरी विविध पध्दती
बेसावध ठेवून शत्रुला
घाव घाली मुळावरती

मावळे मनोबल दृढता
उच्च स्वराज्याचीप्रिती
स्नेह भरभरून मनात
हरेक मावळ्यांचे प्रति

काळजीघेई कुटूंबाची
जया मिळता वीरगती
तथ्य जाणे सदासर्वदा
विजय नसे सहजगति

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# पालकांनो मुलांचा बौद्धिक कल ओळखा


महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेचा ऑनलाइन निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या निकालात बहुतांश विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. आता पुढील शिक्षणासाठी हे विद्यार्थी सज्ज झाले आहेत. त्यासाठी बऱ्याच विद्यार्थ्यांपुढे आपण कोणत्या शाखेला प्रवेश घ्यावा? हा प्रश्न नक्कीच उभा राहिला असेल. कारण प्रत्येक विद्यार्थ्याला आपला शैक्षणिक कल व आपली आवड, कोणत्या शाखेकडे आहे? हे त्यांना अगोदरच माहीत असते. म्हणून दहावी व बारावीनंतर आपण कोणते शैक्षणिक क्षेत्र निवडावे हे विद्यार्थ्यांनी अगोदरच निश्चित करून ठेवलेले असते. काही विद्यार्थी आपला बौद्धिक कल ओळखून आपापल्या आवडीनुसार शैक्षणिक क्षेत्र निवडतात. पण काही विद्यार्थ्यांना आपला शैक्षणिक कल कोणत्या क्षेत्रात आहे, हे माहीत असूनही, केवळ आई-वडिलांच्या दबावामुळे व सक्तीमुळे त्यांना नको ते क्षेत्र निवडावे लागते. नंतर विद्यार्थ्यांना त्या शैक्षणिक क्षेत्राची आवड नसल्यामुळे त्यांना अभ्यास रटाळ, किचकट व समजायला थोडा अवघड जातो. त्यामुळे विद्यार्थी पालकांच्या अपेक्षांचे ओझे पेलण्यात पूर्णपणे अपयशी ठरतात. एकतर विद्यार्थी अगोदरच आई-वडिलांच्या दबावामुळे नको ते क्षेत्र निवडल्यामुळे नाराज झालेले असतात आणि त्यातच विद्यार्थ्यांना त्या क्षेत्रात अपयश आल्यामुळे विद्यार्थी अधिकच नाराज होतात. त्यांना वाटते की, आपण आई-वडिलांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात कमी पडलो आहोत. आपण आई-वडिलांची इच्छा पूर्ण करू शकलो नाही. आता आपल्याला आई वडील काय म्हणतील? गावकरी व समाज बांधव काय म्हणतील? या विचारांनी ते भयभीत होतात. आतून पूर्णपणे खचून जातात. आणि स्वतःला नैराश्याच्या खाईत लोटतात. आई वडीलही त्यांना खूप रागावतात, गावातील मित्रमंडळी त्यांना चिडवते व टोमणे मारून हिनवते. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा तणाव अधिकच वाढतो. आणि त्यांच्या डोक्यात सारखे आत्महत्येचे विचार रुंजी घालू लागतात. आणि त्यांना जीवन जगण्यात निरर्थकता वाटू लागते. म्हणून ते स्वतःला संपवण्याचा प्रयत्न करतात. आणि आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलून एकदिवस स्वतःचे जीवन संपवतात. अशा धक्कादायक घटना आपण दररोज वर्तमानपत्रात वाचत आहोत. सोशल मीडियावर व टीव्हीवर पाहत आहोत. अशा घटना घडण्यामागे त्या विद्यार्थ्यांचे आई वडील कारणीभूत आहेत, असेच म्हणावे लागेल. कारण बहुतांश मुलांचे आई वडील आपल्या मुलांची बौद्धिक आवड व कल कोणत्या क्षेत्राकडे आहे, हे न बघता आपल्या मुलांना वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी क्षेत्रात शिक्षण घेण्यास प्रवृत्त करतात. परंतु मुलांचा बौद्धिक कल हा वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी क्षेत्राकडे नसून तो कला किंवा वाणिज्य शाखेकडे असू शकतो. म्हणून त्यांना या क्षेत्रात अपयश येते. जर प्रत्येक आई-वडिलांना आपल्या मुलांनी भविष्यात घवघवीत व उज्वल यश संपादन करावे, असे वाटत असेल तर आपल्या मुलांवर कोणत्याच अपेक्षांचे ओझे न लादता, त्यांच्यावर कोणतीच जबरदस्ती न करता, आपल्या मुलांचा बौद्धिक कल व शैक्षणिक आवड कोणत्या क्षेत्रात आहे, हे लक्षात घेऊन त्यांना त्या क्षेत्रात त्यांच्या मनाप्रमाणे शिक्षण घेण्यास प्रवृत्त करावे. म्हणजे ते त्या क्षेत्रात नक्कीच यशाला गवसणी घातल्याशिवाय राहणार नाहीत. आजपर्यंत ज्या ज्या व्यक्ती यशोशिखरावर विराजमान झाल्या, त्या व्यक्तींनी अगोदर आपला शैक्षणिक कल व आवड लक्षात घेऊन त्यानुसार शिक्षण घेतले, म्हणून ते यशाचे शिखर पादाक्रांत करू शकले. परंतु खेदाची बाब अशी की, आपल्या भारत देशात बहुतांश पालकांचा ओढा हा वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी क्षेत्राकडे असल्याचे दिसून येत आहे. म्हणून प्रत्येक आईवडील आपल्या मुलाला किंवा मुलीला मेडिकल किंवा इंजीनियरिंग या क्षेत्रात शिक्षण घेण्याची जबरदस्ती करत आहेत. पण मुलांचा बौद्धिक कल हा वेगळ्याच क्षेत्राकडे असतो. ज्या मुलांचा कल कला किंवा वाणिज्य क्षेत्राकडे असतो, त्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शिक्षण दिल्यास ते विद्यार्थी कसे काय यशस्वी होतील? हा विचार करायला लावणारा प्रश्न आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांचा ओढा हा आपापल्या बौद्धिक कलानुसार वेगवेगळ्या क्षेत्राकडे असू शकतो. काही मुलांचा ओढा वैद्यकीय क्षेत्राकडे असू शकतो, काही मुलांचा ओढा अभियांत्रिकी क्षेत्राकडे असू शकतो, काही मुलांचा ओढा हा वाणिज्य क्षेत्राकडे असू शकतो तर काही मुलांचा ओढा हा कला क्षेत्राकडे असू शकतो. पण आजकाल असे झाले आहे की, प्रत्येक आई-वडिलांना आपला मुलगा डॉक्टर किंवा अभियंता व्हावा असे वाटत आहे. त्यामुळे कोणत्याच आई-वडिलांना आपल्या मुलाने कला किंवा वाणिज्य शाखेला प्रवेश घ्यावा असे वाटत नाही. तर त्यांना वाटते की, आपल्या मुलाने डॉक्टर किंवा अभियंता व्हावे, याचा अर्थ असा की, आजकालच्या पालकांचा असा गैरसमज झालेला आहे की, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी या दोन क्षेत्रांमध्ये जास्त पैसा व प्रतिष्ठा आहे. इतर क्षेत्रांत म्हणावा तेवढा पैसा व प्रतिष्ठा नाही. म्हणून बहुतांश पालक आपल्या मुलांना डॉक्टर किंवा अभियंता होण्याचा तगादा लावतात. पण मुलांचा बौद्धिक कल काही वेगळाच असल्यामुळे, विद्यार्थ्यांना त्या क्षेत्रात यशाला मुकावे लागते. म्हणून सध्या विद्यार्थी आत्महत्येचे प्रमाण खूप वाढले आहे. याचा विचार प्रत्येक पालकांनी करणे गरजेचे आहे. याचा परिणाम आपल्या देशाच्या विकासावर सुध्दा होत आहे. कारण हे आजचे विद्यार्थी उद्याच्या देशाचे शिल्पकार असतात. पण हेच विद्यार्थी जर योग्य दिशेने वाटचाल करायचे सोडून, नको त्या क्षेत्रात, केवळ आई-वडिलांच्या जबरदस्तीमुळे भरकटत जात असतील तर त्या मुलांचे उद्याचे भवितव्य विनाशाच्या उंबरठ्यावर असेल, हे कोणालाही मान्य करावेच लागेल. अमेरिका, चीन व जपान या प्रगतिशील देशांमध्ये आजही मुलगा पाच वर्षाचा झाला की, त्या मुलाच्या मेंदूची तपासणी करून त्या मुलांचा बौद्धिक कल लक्षात घेतला जातो, आणि त्यानुसार त्याला योग्य ते शिक्षण देऊन त्या क्षेत्रामध्ये सक्षम केले जाते. मग ती मुले त्या क्षेत्रामध्ये नक्कीच यशाचा झेंडा रोवल्याशिवाय राहत नाहीत. म्हणूनच अमेरिका, जपान व चीन हे तिन्ही देश आज जगाची महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत. पण खेदाची बाब अशी की, आपला भारत देश जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश असूनही इतर देशांच्या तुलनेत मागे पडत आहे. याचा अर्थ असा की, आपल्या देशात आजही विद्यार्थ्यांचा बौद्धिक कल लक्षात न घेता, त्यांना मनमानी व सक्तीचे शिक्षण देऊन त्यांच्या यशाच्या योग्य वाटा बंद केल्या जात आहेत. आणि त्यांना अयोग्य दिशेने वाटचाल करण्याची सक्ती केली जात आहे. म्हणून बहुतांश विद्यार्थी जीवनात अपयशी ठरत आहेत. आणि आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. आणि याला सर्वस्वी जबाबदार त्या मुलांचे आई-वडील ठरत आहेत. असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. म्हणून जाता जाता समस्त पालकांना माझी कळकळीची नम्र विनंती आहे की, पालकांनो जर तुम्हाला खरंच आपला मुलगा जीवनात यशस्वी व्हावा असे वाटत असेल आणि त्याने कोणत्यातरी क्षेत्रात आपला व आपल्या गावाचा नावलौकिक करावा असे वाटत असेल तर सर्वप्रथम आपण आपल्या मुलांचा बौद्धिक कल कोणत्या क्षेत्राकडे आहे, हे ओळखून त्यानुसार त्याला शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे, म्हणजे त्याला शिक्षण घेण्यास सोपे जाईल व त्याची जिज्ञासा आणखीन वाढेल... त्यासाठी प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांचा बौद्धिक कल ओळखून त्याला योग्य ते शिक्षण देणे काळाची गरज आहे, असे मला वाटते....

**– बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## येडशी येथे मोफत वारकरी, स्वावलंबन, संगीत, कलात्मक प्रशिक्षण शिबीराचे आयोजन




**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१५, धाराशिव :** धाराशिव तालुक्यातील येडशी येथील श्री संत वै.रामकृष्ण भाऊ, भगवान भाऊ, परमेश्वर महाराज मंदिर आश्रम व मृदंगाचार्य जालिंदर (बप्पा) सस्ते वारकरी सेवा मंडळ संचलित वारकरी शिक्षण संस्था व संगीत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वारकरी सांप्रदायिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दि.२१ मे ते ११ जून २०२५ या कालावधीत करण्यात आले आहे. या शिबिरात १५ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला जाणार आसुन विद्यार्थ्यांची गुरकुल पद्धतीने निवासी राहून प्रशिक्षण देण्याचे व्यवस्थापन ही करण्यात आले आहे. वारकरी सांप्रदाईक भजन गायन, हरीपाठ, मृदंगवादन, गीतापाठ, भारूड दिंडी पाऊले तर संगीतातील हार्मोनियम, तबला तसेच सुसंस्कारा बरोबरच संगणक, योग, प्रणायाम यांचे मार्गादर्शन तर सेवा कार्याभाग स्वरूपात स्वावलंबनात्मक धडे आदि प्रकारचे शिक्षण दिले जाणार आहे. तरी आत्मसात करू इच्छुकांनी ऐच्छीक विषयानुरूप या शिबीरात सहभाग नोंदवण्यासाठी संपर्क साधुन नोंदणी करण्याचे अवाहान मंदिर संस्थेचे धार्मिक कार्यसेवक व मृदंगाचार्य जालिंदर (बप्पा) सस्ते वारकरी सेवा मंडळाचे सचिव महादेव जालिंदर सस्ते (गुरुजी) संपर्क मो.९४२०२०११९५ यांनी केले आहे.

## मांजरसुंबाहून आंबेजोगाई कडे जाणाऱ्या कंटेनरने अनेकांना चिरडले

### एक जण ठार तर २० पेक्षाही अधिक जण जखमी

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१६, केज :** आज दि.१६ रोजी दुपारच्या वेळी केज येथे मांजरसुंबाहुन येणाऱ्या कंटेनर ने नेकनूर पासून चंदन सावरगाव पर्यंत आठ ते दहा ठिकाणी लोकांना चिरडले आहे त्यामध्ये एक जण ठार झाले असून अनेक जण गंभीर जखमी आहेत. आज केज येथील बाजार असल्यामुळे रोडवर गर्दा असतो त्यामुळे बरेच लोक कंटेनर चा खाली आले त्यामुळे अनेक जण रक्ताचा थारोळ्यात पडलेले होते. हे सगळे भयानक वातावरण पाहून नागरिक भयभीत झाले होते. यापुढे चंदन सावरगाव पलीकडे जाऊन हे कंटेनर पलटी झाले आहे.

## अवैध अनधिकृत विना परवाना खत साठा गुन्हा नोंद



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१६, धाराशिव :** जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) सुनील बोरकर, विभागीय कृषी सहसंचालक लातूर विभाग लातूर साहेबराव दिवेकर व मुख्य गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक प्रवीण देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, कृषी विकास अधिकारी प्रमोद राठोड यांच्या नियोजनातून जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय भरारी पथकाने संयुक्तपणे धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात एका शेतकऱ्याच्या कुक्कुटपालन शेड मध्ये विनापरवाना एकूण ४५६ पोते रासायनिक खत (वजन २०मे. टन) निदर्शनास आल्यामुळे आज पोलीस ठाणे वाशी तालुका वाशी जिल्हा धाराशिव येथे गुन्हा नोंद करण्यात आला आणि एकूण ४.६१ लक्ष रुपये किमतीचा रासायनिक खत साठा जप्त करण्यात आला. सदरील गुन्ह्याची फिर्याद राजाराम बर्वे, तालुका कृषी अधिकारी वाशी यांनी दिली. सोबत मोहीम अधिकारी डी ए गरगडे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, धाराशिव प्रवीण पाटील, पंचायत समिती वाशी कार्यालयाचे कृषी अधिकारी अविनाश माळी, विस्तार अधिकारी कृषि श्रीकांत साळवे, तालुका कृषी अधिकारी वाशी कार्यालयातील गायकवाड, साखरे हे होते. याकामी प्रवीण विठ्ठल भोर तंत्र अधिकारी गु.नि.लातूर यांनी सखोल मार्गदर्शन केले.

## संत रामकृष्ण महाराज विद्या मंदिर शाळेचा दहावीचानिकाल १०० टक्के




**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१६, केज :** केज तालुक्यातील हादगाव येथील संत रामकृष्ण महाराज विद्यामंदिर शाळेचा मार्च २०२५मध्ये झालेल्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल दिनांक १३ मे २०२५ रोजी दुपारी एक वाजता जाहीर झाला.शाळेने गेल्या पाच वर्षापासून ची उज्वल यशाची परंपरा कायम राखली असून शाळेचा निकाल १००% टक्के लागलेला आहे. या या शाळेतील शिक्षक वृंदांनी विद्यार्थी घडवून सातत्याने संस्थेचे, गावाचे,तालुक्याचे, नाव उंचावण्याचे काम केलेले आहे.चालू वर्षी ही शाळेच्या विद्यार्थ्यांनी अटकेपार झेंडारोवला आहे.प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी शाळेचा निकाल उत्कृष्ट लागला असून विद्यार्थी व विद्यार्थिनींनी अतिशय चांगले गुण प्राप्त केले आहेत.शाळेमध्ये सर्व प्रथम येण्याचा मान कु. वनवे प्रणिता शशिकांत ९६. ००%, सारूक वाडी, द्वितीय कु. गदळे आर्या अण्णासाहेब ९४.००% हादगाव तर तृतीय स्थान भांगे ओंकार पंडित ९३.८०% डोका याने पटकावले आहे.शाळेमध्ये इयत्ता दहावीच्या वर्गातील ३१ पैकी ३१ विध्यार्थी पास झाले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात यश मिळवले असल्याने शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव विद्यार्थ्यांवर होत आहे. आज दि. १४ /५ /२५ रोजी वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व पालकांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन शाळेच्या व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार समारंभ पार पडला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना माजी उपसरपंच श्री. महादेव वायबसे यांनी हे यश विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे,शिक्षकांच्या विद्यार्थ्या प्रती असलेल्या समर्पणाचे व पालकांच्या त्यागाचे असल्याचे मत मांडले.तसेच विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाट चालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी सरपंच उमेश यादव, अनंत वनवे, जालिंदर भांगे, लालासाहेब वायबसे, मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ५८ सुवर्ण, ४७ रौप्य, ५३ कांस्य पदकांसह १५८ पदकांची लयलूट

## खेलो इंडियात महाराष्ट्राची विजेतेपदाची हॅटट्रिक




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, पाटना :** गतविजेत्या महाराष्ट्राने अपेक्षेप्रमाणे सर्वोत्तम कामगिरी करीत खेलो इंडिया युवा स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपदाच्या हॅट्रिकाचा पराक्रम केला. ५८ सुवर्ण, ४७ रौप्य, ५३ कांस्य अशी एकूण १५८ पदकांची लयलूट करीत महाराष्ट्राने अव्वल स्थानाचे शिखर सर केले. तब्बल ९ स्पर्धा विक्रमांचा पराक्रमही महाराष्ट्राने यंदाच्या ७व्या खेलो इंडिया स्पर्धेत केला आहे.

पाटलीपुत्र क्रीडा संकुलातील समारोप समारंभात बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी व केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खेडसे यांच्या हस्ते महाराष्ट्राला विजेतेपदकाचा करंडक देऊन गौरविण्यात आले. पथकप्रमुख महादेव कसगावडे, सहाय्यक संचालक भाग्यश्री बीले, क्रीडाधिकारी अरूण पाटील, शिवाजी कोळीसह मराठमोळ्या खेळाडूंनी विजेतेपदाचा करंडक स्वीकारला. करंडक स्वीकारल्यानंतर महाराष्ट्राच्या जयघोषाने परिसर दुमदुमला.

खेलो इंडिया स्पर्धेमुळे ग्रामिण भागातील खेळाडूंना राष्ट्रीय व्यासपीठ निर्माण झाले आहे असू सांगून केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खेडसे पुढे म्हणाल्या की, स्पर्धेत माझ्या महाराष्ट्राने सर्वाधिक पदक जिंकली याचा मला आनंद आहे, महाराष्टसह सर्व पदकविजत्यांचे मी अभिनंदन करते. मध्यप्रदेश, तामिळनाडू पाठोपाठ बिहारमध्येही महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सर्वाधिक पदकांचे शिखर पूर्ण करीत विजेतेपद पटकाविले. महाराष्ट्राच्या पदक विजेत्या खेळाडूंचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर व क्रीडा आयुक्त हिरालाल सोनवणे, सहसंचालक सुधिर मोरे यांनी दृकश्राव्य प्रणालीव्दारे अभिनंदन केले. गत तामिळनाडू स्पर्धेत ५७ सुवर्ण, ४८ रौप्य व ५३ कांस्य अशी एकूण १५८ पदके मिळवून महाराष्ट्राने अपेक्षेप्रमाणे निर्विवाद वर्चस्व गाजविले होते. मध्यप्रदेश पाठोपाठ तामिळनाडूत सर्वसाधारण विजेतेपदावर आपले नाव कोरले होते.

बिहार स्पर्धेत महाराष्ट्राने ९ स्पर्धा विक्रमाची नोंद केली. वेटलिफ्टिंग अस्मिता ढोणेने २, साईराज परदेशीने ३, ॲथलेटिक्समध्ये सैफ चाफेकर, रोहित बिन्नार, आदित्य पिसाळ व रिले संघाने प्रत्येकी १ असे एकूण ९ स्पर्धा विक्रम प्रथमच खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या नावापुढे झळकले आहेत.

अपेक्षेप्रमाणे सर्वोत्तम कामगिरी करीत ७ व्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत अव्वल स्थान कायम राखले. हरियाणाने ३९ सुवर्ण, २७ रौप्य, ५१ कांस्य पदकांसह एकूण ११७ पदके जिंकून दुसरे स्थान प्राप्त केले. राजस्थान २४ सुवर्ण, १२ रौप्य, २४ कांस्य एकूण ६० पदकांसह तिसर्या स्थानावर राहिला. स्पर्धेतील २७ पैकी २२ क्रीडाप्रकारांमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकांचा करिश्मा घडविला. ॲथलेटिक्समध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक १० सुवर्णपदकांना गवसणी घातली, तर जलतरणात ७ सुवर्णासह एकूण २९ पदके कमविली. जिम्नॅस्टिक्समध्ये ६, आर्चरीत ६, वेटलिफ्टिंगमध्ये ५ सुवर्णपदके महाराष्ट्राने पटकावली. कुस्ती, सायकलिंग, नेमबाजीत महाराष्ट्राने सुवर्ण चौकार झळकविला. सॅपकटकरॉव, गटका, रग्बी या खेळातही महाराष्ट्र चमकला. स्पर्धत ४३७ खेळाडूंसह १२८ प्रशिक्षक, व्यवस्थापक असे एकूण ५६५ जणांचे पथक सहभागी झाले होते.

महाराष्ट्राने खेलो इंडिया स्पर्धेतील पाचव्या विजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. आतापर्यंत झालेल्या सहा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने पाच वेळा, तर हरयाणाने दोन वेळा या स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले आहे. २०१८ पासून दिल्ली येथून खेलो इंडिया स्पर्धेला प्रारंभ झाला. पहिल्या स्पर्धेत महाराष्ट्राने सर्वसाधारण उपविजेतेपद पटकावले होते. २०१९ साली पुणे , २०२० साली आसाम स्पर्धेत महाराष्ट्राने विजेतेपद पटकावले होते. त्यानंतर २०२३ साली मध्य प्रदेशमधील स्पर्धेत विजेतेपद महाराष्ट्राने खेचून आणले. गतवर्षी २०२४ मध्ये तामिळनाडूत महाराष्ट्र चॅम्पियन ठरला होता.

# मुंबई, ठाण्यात स्वतःचे घर घेणाऱ्यांसाठी सुवर्णसंधी !

### * म्हाडा जुलैमध्ये काढणार तब्बल ४००० घरांसाठी लॉटरी




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१६, मुंबई :** म्हाडा लवकरच एक मोठी लॉटरी आयोजित करणार आहे. ही लॉटरी कोकण मंडळातर्फे जुलैमध्ये आयोजित केली जाईल. सुमारे चार हजार घरे उपलब्ध असतील.

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) लवकरच ही ४,००० घरांसाठी लॉटरी काढणार आहे. ही लॉटरी जुलैमध्ये काढली जाईल. या लॉटरीमध्ये ठाणे आणि कल्याणमधील घरांचा समावेश असेल. यापैकी १,००० हून अधिक घरे ठाण्यातील चितळसर येथे आहेत. म्हाडाच्या या लॉटरीच्या माध्यमातून असंख्य लोकांचे स्वतःचे घर असण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. खरंतर म्हाडा दरवर्षी मुंबई आणि राज्यातील इतर महानगरांमध्ये सामान्य माणसाला घर खरेदी करता यावे यासाठी लॉटरी आयोजित करते. या लॉटरीद्वारे लोकांना परवडणाऱ्या किमतीत घरे मिळू शकतील.जुलै महिन्यात कोकण विभाग कल्याण आणि ठाणे शहरांसाठी लॉटरी काढेल. म्हाडाच्या कोकण मंडळाने गेल्या दीड वर्षात तीन लॉटऱ्या काढल्या आहेत. या लॉटरीद्वारे सुमारे दहा हजार लोकांचे घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. जुलैमध्ये होणाऱ्या लॉटरीने अनेक लोकांची स्वप्ने सत्यात उतरवली जातील. कोकण मंडळांच्या या सोडतीत, ठाणे कल्याणमध्ये सर्वाधिक घरे आहेत. यामध्ये ठाण्यातील चितळसर येथील ११७३ घरांचा समावेश आहे. म्हाडाला कल्याणमध्ये २५०० घरेही मिळतील. याशिवाय, म्हाडाच्या गृहनिर्माण साठ्यातून मिळालेल्या घरांचाही त्यात समावेश केला जाईल.

**मुंबईत ५००० हून अधिक घरे**

म्हाडाने २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात राज्यभरात १९,४९७ घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये मुंबईतील ५,१९९ घरांचा समावेश आहे. यामुळे म्हाडा घर खरेदी करण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या लोकांना दिलासा मिळेल. म्हाडाच्या अर्थसंकल्पात कोकण विभागात ९,९०२, पुण्यात १,८३६, नागपूरमध्ये ६९२, छत्रपती संभाजी नगरमध्ये १,६०८, नाशिकमध्ये ९१ आणि अमरावतीमध्ये १६९ घरे बांधण्याचे उद्दिष्ट आहे.

यासाठी मुंबईतील घरांसाठी ५७४९.४९ कोटी रुपये आणि कोकणातील घरांसाठी १४०८.८५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पुण्यातील घरांसाठी ५८५ कोटी रुपये, नागपूरमधील घरांसाठी १००९ कोटी रुपये, छत्रपती संभाजीनगरमधील घरांसाठी २३१ कोटी रुपये, नाशिकमधील घरांसाठी ८६ कोटी रुपये आणि अमरावतीमधील घरांसाठी ६५.९६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# ठाणे ते वसई विरार प्रवास होणार सुखकर...

### घोडबंदर रोडची देखील लवकरच वाहतूक कोंडीतून मुक्तता होणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१६, ठाणे :**

ठाणे शहराच्या वाहतूक दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या भाईंदरपाडा उड्डाणपुल अखेर नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत उड्डाणपुलाचे लोकार्पण पार पाडले आहे. या उड्डाणपुलामुळं नागरिकांचा वेळ वाचणार आहे तसंच, प्रवासदेखील आणखी जलद व आरामशीर होणार आहे.

उड्डाणपुलाची विशेष बाब म्हणजे तो मेट्रो लाईन ४ व ४अ च्या व्हायाडक्टवर उभारण्यात आला आहे, त्यामुळे एकाच जागेचा प्रभावी वापर करून रस्ते आणि मेट्रो यांच्यातील समन्वय साधण्यात आला आहे. भविष्यात मेट्रो सेवा सुरू झाल्यावर या भागातील रहिवाशांना सहजपणे मेट्रो स्थानकांपर्यंत पोहोचता येणार आहे. या प्रकल्पाद्वारे ठाणे, भिवंडी, नवी मुंबई, जेएनपीटी तसेच बोरिवली, वसई-विरार आणि गुजरातकडे जाणाऱ्या वाहनांसाठी वाहतूक अधिक सुरळीत आणि जलद होणार आहे.

**या प्रकल्पाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.**
- उड्डाणपुलाची एकूण रॅम्प लांबी: ६०१ मीटर (ठाणे कडील बाजू - ३९१.४८ मी, भुयारी मार्ग - २०.४ मी.बोरिवलीकडील बाजू- १८९.८८ मी)
- मार्गिका: २+२ (७. ५ मीटर + ७. ५ मीटर)
- भुयारी मार्ग : २*२ लेन (लांबी २०.४ मी.*रुंदी १९.७ मी.)
- वाहन घनता : अंदाजे ७३,३३३ PCU

या प्रकल्पामुळे ठाणे पूर्व, घोडबंदर रोड, गायमुख, कासारवडवली, ब्रह्मांड, वाघबिळ आणि भाईंदरपाडा परिसरातील नागरिकांना प्रत्यक्ष फायदा होणार आहे. दररोजचा प्रवास जलद, सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. याशिवाय, या प्रकल्पात स्थानिकांना घोडबंदरच्या डाव्या उजव्या बाजुला जाता यावे म्हणून स्वतंत्र भुयारी मार्ग सुद्धा बांधण्यात आला आहे. त्यामुळे वरच्या उड्डाणपुलावरील सामान्य वाहतुकीवरील ताण कमी होईल. परिणामी, गायमुख ते वाघबिळ दरम्यानची वाहतूक कोंडी सुटेल आणि घोडबंदर रस्त्यावरील वाहतूक अधिक गतिमान आणि प्रदूषणमुक्त होईल.

घोडबंदर रस्ता हा गुजरात ते जेएनपीटी दरम्यानच्या आंतरराज्यीय जड वाहन वाहतुकीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. या मार्गावरच्या गायमुख ते वाघबिळ दरम्यानची वाहतूक कोंडी आता लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. जड वाहने आणि ऑफिस प्रवासी यांच्यामुळे या रस्त्यावर नेहमी ताण असतो, तो आता कमी होईल. उड्डाणपुलामुळे प्रवासाचा वेळ कमी होऊन, सरासरी वेग वाढेल.

## स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांसाठी वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, ठाणे :** ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागांवर निवडणूक लढवायची असल्यास, त्या व्यक्तींनी जातीचे प्रमाणपत्र आणि पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ही वैधता प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी अजून बारा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली असून या बाबतचा अध्यादेश राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या द्वारा (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दि.३० एप्रिल २०२५) निर्गमित करण्यात आला आहे.

ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागांवर निवडणूक लढवायची असल्यास, त्या व्यक्तींनी जातीचे प्रमाणपत्र आणि पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

मात्र अनेकदा उमेदवारांनी वेळेवर अर्ज करून सुद्धा, पडताळणी समितीकडे कामाचे ओझे अधिक असल्यामुळे प्रमाणपत्र मिळायला वेळ लागतो. त्यामुळे अनेक निवडून आलेल्या सदस्यांना वेळेत वैधता प्रमाणपत्र मिळत नाही आणि ते अपात्र (निरर्ह) ठरवले जातात. ही अडचण लक्षात घेऊन, महाराष्ट्र (ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणूकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अधिनियम २०२३ (२०२३ चा महा.३५) याद्वारे १२ महिन्यांकरता मुदतवाढ देण्यात आली होती.

# अभ्यासिका शैक्षणिक प्रगतीसाठी भक्कम पाया ठरेल : आ. किशोर जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** शिक्षण ही आपल्या समाजाची खरी ताकद आहे. ही ताकद भक्कम करायची असेल तर त्यासाठी पायाभूत सुविधा पुरवणं ही आमची जबाबदारी आहे. आजचं हे भूमिपूजन म्हणजे केवळ एका इमारतीची सुरुवात नाही, तर ज्ञानदालन उभारण्याची प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांना शांत, प्रेरणादायी आणि आधुनिक वातावरणात अभ्यास करण्याची संधी देणारी ही वास्तू असून पडोली येथे उभारण्यात येणारी ही अभ्यासिका शैक्षणिक प्रगतीसाठी भक्कम पाया ठरेल, असे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या अंतर्गत एक कोटी रुपयांच्या निधीतून पडोली येथे उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक अभ्यासिकेच्या कामाचे भूमिपूजन आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे




माजी शहराध्यक्ष दशरथसिंह ठाकूर, पडोली ग्रामपंचायतचे सरपंच विक्की लाडसे, उपसरपंच संगिता नागरकर, नामदेव डाहुले, प्रकाश देवतळे, बलराम डोडाणी, मनोज पाल, नकुल वासमवार, ग्रामपंचायत सदस्या छाया पायघन, शामलता इटनकर, सुनिता पिंपळकर, शबाना शेख, राकेश पिंपळकर, संजय बुरघाटे, जय मिश्रा आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले, ही केवळ एक इमारतीची सुरुवात नसून आपल्या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी टाकलेले एक विश्वासार्ह आणि महत्वाचे पाऊल आहे. माझ्या मतदारसंघातील प्रत्येक विद्यार्थी पुढे जावा, स्पर्धा परीक्षा देऊन यश मिळवावे, अधिकारी बनावा, यासाठी ही अभ्यासिका उपयुक्त ठरेल. अभ्यासिकेमध्ये वाचनालय, बैठकीच्या आधुनिक सुविधा, वीज, पाणी व्यवस्था, मला-मुलींसाठी स्वतंत्र व्यवस्था अशा सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. आपल्या मुला-मुलींनी शिकून मोठं व्हावं, ही फक्त पालकांचीच नाही तर आमटीहून जबाबदारी आहे. त्यामुळे अशा विकासकामांना आम्हा सर्वोच्च प्राधान्य देत आहोत.

मागील पाच वर्षात आपण मतदारसंघात ११ अभ्यासिका उभारण्याचा संकल्प केला होता. त्यापेक्षाही अधिक अभ्यासिका आपण उभारु शकलो याचा मला आनंद आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिक्षा दिलेल्या दीक्षाभूमी येथे आपण एक कोटी रुपयातून भव्य अभ्यासिका उभारली आहे. जिथे शेकडो विद्यार्थी अभास करतात. अनेक अभ्यासिकांची कामे प्रगतीपथावर आहेत. आज पडोली येथील अभ्यासिकेचे भूमिपूजन झाले असून, वर्षभरात ही अभ्यासिका पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी बोलतांना आ. जोरगेवार यांनी अभ्यासिका पूर्ण झाल्यानंतर साहित्य खरेदीसाठी आणखी २५ लाख रुपयांचा निधी देण्यात येईल, अशी घोषणा केली. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# धाराशिव येथे उद्या भव्य बौध्द धम्म परिषद डॉ. भीमराव आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१६, धाराशिव :** भारतीय बौध्द महासभेच्या धाराशिव शाखेच्यावतीने रविवार, १८ मे रोजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह येथे सकाळी ९.३० ते दुपारी ४ या वेळेत भव्य बौध्द धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर हे मार्गदर्शन करणार आहेत. या धम्म परिषदेस जिल्ह्यातील उपासक, उपासिकांनी उपस्थित रहावे, आवाहन संयोजक भारतीय बौध्द महासभा, समता सैनिक दलच्या पदाधिकारी, सदस्यांनी केले आहे. बौध्द धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानी राजश्री शांताराम कदम या असणार आहेत. तर राष्ट्रीय उपाध्यक्ष ॲड. एस. के. भंडारे, महाराष्ट्र अध्यक्ष यु. जी बोराडे, राज्य सरचिटणीस अशोक केदारे हे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी सोलापूरचे जिल्हाध्यक्ष आण्णासाहेब वाघमारे, नागसेन माने, हणमंत प्रतापे, ॲड. दिलीप निकाळजे, ॲड. किशोर पायाळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या धम्म परिषदेत भिक्खु संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष भन्ते महावीरो थेरो, भिक्खु संघाचे सदस्य सारिपुत्त थेरो, तगर भूमीचे संस्थापक अध्यक्ष भन्ते सुमधजी नागसेन हे प्रमुख धम्मदेसना देणार



आहेत. या धम्म परिषदेमध्ये सकाळी ९.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात धव्जारोहण, सामुहिक त्रिशरण पंचशील, समता सैनिक दलाची मानवंदना व अभिवादन, त्यानंतर रॅलीस प्रारंभ होणार आहे.

दुपारी १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह येथे परिषदेचे उद्धाटन होणार आहे. दुपारी ३ वाजता धम्म दिक्षा सोहळा कार्यक्रम तर ४ वाजता धम्म परिषदेचा समारोप होणार आहे.भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव आंबेडकर हे बौध्दगया महाबोधी महाविहार आणि प्राचीन बौध्द तीर्थक्षेत्रे इतिहास व सद्यस्थिती या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.


या भव्य धम्म परिषदेस जिल्ह्यातील उपासक, उपासिकांनी उपस्थित रहावे, आवाहन संयोजक भारतीय बौध्द महासभा, समता सैनिक दलच्या पदाधिकारी, सदस्यांनी केले आहे.

# खा. लंकेंनी अधिका-याच्या लगावली कानशिलात

## अधिकार्यांकडून इन्कार ।। श्रीगोंदा पोलिस ठाण्यात हायहोलटेज ड्रामा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, श्रीगोंदा (अहिल्यानगर) :** आढळगाव ते जामखेड टप्प्याच्या अपूर्ण कामाबाबत सुरू असलेल्या उपोषणात खा. निलेश लंके यांनी संतप्त होवून थेट राष्ट्रीय महामार्गाचे अधिकार्यांच्या कानाखाली ठेवून दिली. दरम्यान, या प्रकरानंतर संबंधीत अधिकार्यांकडून घडलेल्या बाक्या प्रसंगाबाबत इन्कार केला असला तरी लंके समर्थकांकडून घडलेल्या प्रकाराबाबत दावा करण्यात आला आहे. या प्रकारानंतर काम अपूर्ण ठेवणार्या रस्त्याच्या ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यासाठी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात हायहोलटेज ड्रामा रंगला.



श्रीगोंदा शहरातून जाणाऱ्या या महामार्गाच्या मोजणी संदर्भात खासदार निलेश लंके यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाला पत्र दिले होते. विभागाचे उपअभियंता अजित गायके यांनी पत्राचा चुकीच्या संदर्भाने गैरवापर करीत बदनामी व जनतेत संभ्रम निर्माण केल्याची तक्रार पोलीस ठाण्यात देण्यात आली. मी एक जबाबदार लोकप्रतिनिधी आहे. मी कोणालाही मारहाण केली नाही फक्त माझ्या शैलीत जाब विचारला.
**-- खासदार निलेश लंके**

राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी वरील आढळगाव ते जामखेड या रस्त्याच्या अपूर्ण काम व रखडलेल्या टप्प्यासाठी सतत आंदोलन करूनही अधिकार्यांकडून दिलेल्या आश्वासनांची पूर्ती होत नसल्याने खा. निलेश लंके प्रतिष्ठान श्रीगोंद्याचे अध्यक्ष सुभान तांबोळी १३ मेपासून आढळगाव येथे उपोषणाला बसले होते. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी खा. लंके गुरूवारी आले होते. यावेळी राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी व ठेकेदाराला कामाच्या दिरंगाईबाबत जाब विचारत त्यांना थेट अधिकार्यांच्या कानशिलात लगावत चोप दिला. या प्रकारामुळे खळबळ उडाली. दरम्यान, घडलेल्या प्रकाराबाबत अधिकार्यांनी चुपी साधत, रस्त्याचे काम अपूर्ण ठेवणार्या ठेकेदारावर कारवाईसाठी खासदारासह उशिरापर्यंत पोलीस ठाण्यात गर्दी. यावेळी चांगलाच राजकीय हायहोलटेज ड्रामा रंगला.

गेल्या वर्षांपासून राष्ट्रीय महामार्ग ५४८ डीचे काम सुरू आहे. परंतू ठेकेदार निखिल कन्स्ट्रक्शनने आढळगाव गावठाण नजीक बसस्थानकावर एक किलोमीटर व वालवडपर्यंत टप्यात सुमारे पाच किलोमीटर रस्त्याचे काम अपूर्ण व अस्ताव्यस्त उकरून ठेवले आहे. यामुळे या परिसरात जवळपास १० ते १२ निष्पाप लोकांचा अपघात मृत्यू झाला आहे, तर शेकडोजन जायबंदी झाले आहेत. या आधीही तांबोळी यांनी तीन वेळा उपोषण केले होते. यावेळीही खा. लंके यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांनी काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले होते.

प्रत्येक वेळी आश्वासनांची पूर्तता होत नसल्याने गुरुवारी आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी खा. लंके अधिकाऱ्यांना पाहून संतापले व राग अनावर न झाल्याने त्यांनी थेट अधिकाऱ्यांवर हात उगारला. त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग उपअभियंता अजित गायके, सदानंद शिंदे - निखिल कन्स्ट्रक्शनचे प्रोजेक्ट मॅनेजर सदानंद शिंदे व राष्ट्रीय महामार्ग कार्यकारी अभियंता शेवाळे यांना खा. लंके यांनी आपल्या गाडीत बसवून थेट श्रीगोंदा पोलिस ठाण्यात आणले व रस्त्याच्या ठेकेदारावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी पोलिस ठाण्यातच फरशीवर ठिय्या मांडला. त्यानंतर सायंकाळी उशिरापर्यंत पोलिस ठाण्यात हायव्होल्टेज ड्रामा सुरू होता.

# १८ मे रोजी ई-कचरा संकलनासाठी घरापर्यंत येणार गाडी

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, नवी मुंबई :** घनकचरा व्यवस्थापनामध्ये नागरिकांनी कचऱ्याचे निर्मितीच्या ठिकाणीच वर्गीकरण करून महानगरपालिकेकडे प्रक्रियेसाठी द्यावे याबाबत नवी मुंबई महानगरपालिका आग्रही असून त्यादृष्टीने व्यापक जनजागृती करून कार्यवाही करण्यात येत आहे. या अनुषंगाने ई-कचरा अर्थात इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचा कचरा वेगळा संकलित करण्याकडेही महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष लक्ष देण्यात येत आहे. ई-कचरा संकलनासाठी महानगरपालिकेमार्फत वेगळे वेळापत्रक बनविण्यात आले असून रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटी नवी मुंबई आणि थ्रेको कंपनी यांच्या सहकार्याने, ई-वेस्ट रिसायकलींग मोहीम हा अभिनव उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. बहुतांशी नवी मुंबईकर नागरिकांनाही दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी ई-कचरा संकलित करण्यात येतो याची माहिती झाली असून आपल्या घराजवळून ई-कचरा संकलित केल्या जाणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी ही ई-वेस्ट संकलन मोहीम व्यापक स्वरूपात राबविली जात असून याचा लाभ वैयक्तिक पातळीवर नागरिक. गृहनिर्माण संस्था आणि औद्योगिक व इतर संस्था यांच्याकडून घेतला जात आहे.


ई-वेस्ट संकलनासाठी महानगरपालिकेच्या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवरून जारी करण्यात आलेल्या क्यू आर कोडद्वारे अथवा

https://docs.google.com/foA°ms/d/1-qBd5HS-OA5Bp4413z6H-R2X0šbccQyVGP87c1Tyz4k/edit?chA°omeless=1 या गुगल लिंकमधील फॉर्मवर आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व आपल्याकडील ई-कचऱ्याची माहिती नोदविल्यास आपल्याकडील ई-वेस्ट (इलेक्ट्रॉनिक कचरा) गोळा करण्यासाठी आपण दिलेल्या पत्त्यावर अगदी दरवाजापर्यंत वाहन येऊन ई-वेस्ट संकलित केले जाते.

इलेक्ट्रॉनिक कचऱ्याची सुरक्षित आणि जबाबदारीने विल्हेवाट लावणे व त्याचे व्यवस्थापन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून रविवार, दि.१८ मे २०२५ रोजी ही ई-वेस्ट संकलन मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेद्वारे नवी मुंबईकर नागरिकांना मोबाइल, संगणक, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, चार्जर, बॅटऱ्या यांसारख्या वापरात नसलेल्या व टाकून दिलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू पर्यावरणशील पध्दतीने पुनर्प्रक्रिया करण्यासाठी महानगर पालिकेकडे देण्याची संधी मिळत असून या माध्यमातून पर्यावरणस्नेही योगदान देण्याची एक चांगली संधी मिळत आहे. तरी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छता व पर्यावरणप्रेमी जबाबदार, सोसायट्या, विविध संस्था, औद्योगिक संस्था व संघटना यांनी या पर्यावरणपूरक मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा आणि नवी मुंबईच्या स्वच्छता व पर्यावरणशीलतेसाठी अमूल्य योगदान द्यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# थोडक्यात

## श्री ढोकेश्वर कॉलेजमध्ये बीसीए अभ्यासक्रमास मान्यता



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे श्री ढोकेश्वर महाविद्यालय टाकळी ढोकेश्वर येथील कॉलेजचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या पाठपुराव्यामुळे व तत्कालीन प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, कार्यालय अधीक्षक बाळासाहेब गिरी, वरिष्ठ लिपिक उत्तम आगलावे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुदाम वीर, प्रा. रणजित शिंदे यांच्या सहकार्यातून प्रथमच बीसीए या नवीन अभ्यासक्रमास चालू शैक्षणिक वर्षापासून मान्यता मिळाली आहे.

जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, जेष्ठ विश्वास सीताराम खिलारी यांनी या अभ्यासक्रमाच्या मान्यतेसाठी संस्था स्तरावर परवानगी देऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी संस्था स्तरावर बीसीए या कोर्स साठी ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी कौशल्यधिष्टित उपलब्ध करून दिली आहे.

## रयत इंग्लिश मिडीयम स्कुलची १०० टक्के निकाल परंपरा कायम

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१४, खंडाळा (सातारा) :** रयत शिक्षण संस्थेचे रयत इंग्लिश मिडियम स्कूल शिरवळ विद्यालयाचा माध्यमिक शालांत परीक्षा फेब्रुवारी- मार्च- २०२४-२५ चा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला.

प्रथम क्रमांक कु.आर्या विजयकुमार शिंदे ९७.४०%, द्वितीय क्रमांक कु.तनुश्री गोवर्धन चव्हाण ९३.४०%, तृतीय क्रमांक आयुष जितेंद्र घाडगे ९१%,चतुर्थ सुमित प्रदीप पाटील ९०.६०%,तर पाचवा क्रमांक अर्णव चंद्रकांत कचवे ९०.४० % यांनी मिळवला. १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत ९०% च्या वर ५ विद्यार्थी ,८०% च्या वर १० विद्यार्थी आणि प्रथम श्रेणी मध्ये ३ विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना वेळोवेळी माननीय एन.आर.जगदाळे विभागीय अधिकारी मध्य विभाग रयत शिक्षण संस्था सातारा, तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी मेंबर आप्पासाहेब देशमुख,विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे तसेच पर्यवेक्षिका वासंती घाडगे,वर्गशिक्षक गणेश गिरे, विषय शिक्षिका विजया शिंदे,रूकसाना नायकवडी,रुपाली राऊत,पुनम पवार, अश्विनी माने तसेच सुरज नेवसे सर यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांनी माध्यमिक शालांत परीक्षे मध्ये उज्वल यश संपादन करण्यासाठी मुख्याध्यापिका वर्षा मांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले तसेच विद्यार्थ्यांसाठी तज्ञ विषय शिक्षकांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या आणि विद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी,शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य,शिक्षक पालक संघाचे सदस्य,शिरवळ गावचे सरपंच रविराज दुधगावकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष उदय कबुले, माजी सभापती पंचायत समिती खंडाळा राजेंद्रआण्णा तांबे पालक यांच्याकडून विद्यालयाचे विशेष कौतुक होत आहे.

## 'राष्ट्रीय डेंग्यू दिन' निमित्त स्वच्छता कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, पनवेल :** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शुक्रवार, दिनांक १६ मे २०२५ रोजी 'राष्ट्रीय डेंग्यू दिन' साजरा करण्यात येत असून, यानिमित्ताने पनवेल महापालिकेच्यावतीने डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अमंलबजावणी करण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आज आंबेडकर भवन येथे स्वच्छता विभागाच्या कर्मचाऱ्यांना वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने प्रशिक्षण देण्यात आले. उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार घेण्यात आलेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या नेतृत्वाखाली हे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी साथरोग वैद्यकिय अधिकारी डॉ. आकाश ठसाळ, घनकचरा व स्वच्छता विभाग प्रमुख अनिल कोकरे, वैद्यकिय अधिकारी, स्वच्छता निरीक्षक संजय जाधव, आरोग्य पर्यवेक्षक प्रमोद गिरी उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत स्वच्छता कर्मचाऱ्यांना डास उत्पत्ती ठिकाणे कशी ओळखावी, ती नष्ट करण्याबाबत व पुन्हा तयार होऊ नयेत याची प्रेझेंटेशनच्या माध्यमातून माहिती देण्यात आली. तसेच बांधकाम क्षेत्राच्या ठिकाणी घेण्याविषयीची काळजी, धूर फवारणी, औषध फवारणी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याचबरोबर औषध फवारणीची पध्दत, घरांमधील सर्वे याबाबतही यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

## पंचशील विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१६, हदगाव (नांदेड) :** शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयात इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे सचिव सुनील सोनुले यांच्या हस्ते संपन्न झाला.

सुरुवातीला स्वराज्याचे दुसरे छत्रपती महापराक्रमी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.

हदगाव-हिमायतनगर दोन्ही तालुक्यातून अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत कु.अंजली गायकवाड या विद्यार्थिनीने ९७.६० टक्के गुण मिळविले तिचा तिच्या आई-वडिलांसोबत सुनील सोनुले यांनी सत्कार केला यावेळी अंजलीचे डोळे आनंदाने भरून आले कोणतीच शिकवणी न लावता केवळ शाळेत उपस्थित राहून आपण केलेल्या अभ्यासामुळे व शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे आपल्याला हे यश मिळालं हे सांगताना अंजलीचे डोळे आनंदाने भरून आले.

या शाळेतील ९० टक्क्याच्या वर गुण मिळवलेले कु.अंजली गायकवाड,कु.शाश्वती शिंदे,लक्ष्मीकांत नरवाडे,समर्थ वटाणे,अभिजीत चव्हाण, कु.गायत्री वानखेडे,समर्थ पवार,शंभू तावडे,तर ८९ टक्क्याच्या वर गुण प्राप्त केलेले कु.निकिता भालेराव,कु साक्षी तावडे,कु.श्रीदेवी मुंडे,कु.संचिता गुदाल, कु.नंदिनी खंदारे या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.